#antiraggingweek

(नॅक अ+दर्जा)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

**विद्यार्थी विकास**

## परिपत्रक

सर्व संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. उशिसं/मवि-१/ने.सु.बोस वि.उ./परिपत्रक/२०२५/मवि-१/ई. ११४९४७१ दि. १९.०१.२०२६ रोजीच्या पत्रानुसार नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या दि. २३ जानेवारी रोजीच्या जयंती रोजी विविध उपक्रम आयोजित करण्यात यावे, असे कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमित्त खालील विषयावर निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. स्पर्धेत प्रथम, व्दितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त विजेत्या स्पर्धकांना रु. २०००/- रु. १५००/- रु. १०००/- रु. ७००/- अशी रोख पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात येतात. सदर पारितोषिकाचे वितरण दि. १९/०२/२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये केले जाणार आहे. त्याविषयी विजेत्यांना महाविद्यालयांना दूरध्वनीव्दारे कळविण्यात येईल. तसेच सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

निबंधाचे विषय :-

| | |
|---|---|
| १) नेताजी सुभाषचंद्र बोस : एक क्रांतिक्रारी राष्ट्रनायक | २) आझाद हिंद सेना : स्वातंत्र्य लढ्यातील एक तेजस्वी पर्व |
| ३) आजचा तरुणाईसाठी नेताजींचा संदेश | |

नियम :- या निबंध स्पर्धेत विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागातील व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी भाग घेऊ शकतात

१) निबंध इंग्रजी, मराठी, हिंदी भाषेत सादर करता येईल.
२) निबंध किमान २००० शब्दात सादर करावा.
३) निबंध स्वत:च्या हस्ताक्षरातील कागदाच्या एका बाजूने लिहिलेला असावा.
४) निबंध सादर करताना स्वत:चे नाव, वर्ग, विभागाचे नाव, ईमेल, मोबाईल क्रमांक व ओळखपत्राची छायांकितप्रत जोडावी.
५) निबंध दि. २८/०१/२०२६ सायंकाळ ५.०० वाजेपर्यंत प्रत्यक्ष विद्यार्थी विकास विभागात जमा करावे.

विद्यापीठ प्रांगण
छत्रपती संभाजीनगर
संदर्भ क्र : सविवि/२०२६/ 35126-35655
दिनांक : २१ जानेवारी २०२६

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ